दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 16 जुलै 2026 | अंक क्र. 72 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला विकास कामांचा आढावा







## वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिराला पुरातन स्वरूप मिळणार ; तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी दिल्या सूचना

**रेल्वे, कृषी, घनकचरा व्यवस्थापनासह विविध विभागांच्या मॅरेथॉन बैठका**

**बीड प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासनाची विभागनिहाय आढावा बैठक घेतली. रेल्वे, रस्ते, तीर्थक्षेत्र विकास, कृषी पशूसंवर्धन, पर्यावरण, क्रीडा, नगर परिषद प्रशासन यासह सर्वच विभागांचा त्यांनी आढावा घेतल्यामुळे जिल्हा प्रशासन गतिमान झाले आहे.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृहात संपन्न झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि सर्वच विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील नगर पालिका हद्दीतील कचरा व्यवस्थापनाचा आढावा घेतल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी कचरा व्यवस्थापनासाठी मिळणाऱ्या निधीचे लेखापरीक्षण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम परळीकडून देखील सुरु करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेला राज्य सरकारच्या वाट्याचा प्रलंबित निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्या म्हणाल्या.

### वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास योजनेचा आढावा

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या विकास आराखड्यासाठी राज्य सरकारने तीनशे एक कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्यास मान्यता दिली आहे. या अंतर्गत होणार विकास कामांचा ना. पंकजाताई मुंडे यांनी अत्यंत आस्थेने आढावा घेतला. मुख्य मंदिर आणि मंदिर परिसराचा विकास करताना मंदिराचे पुरातन स्वरूप भाविक भक्तांना अनुभवता यावे, सुधारित आराखड्याच्या माध्यमातून मंदिराचा जीर्णोद्धार होत असून हा जीर्णोद्धार कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्य आणि विचारांना साजेसा असावा अशा सूचना ना. पंकजाताई मुंडे यांनी केल्या. या आराखड्यात भाविकांसाठी प्रशस्त अभिषेक मंडप, वाहनतळ, पंचात्तर फूट उंचीची महादेव मूर्ती, हरिहर कुंडाचा विकास, लेजर लाईट शो, अशा अनेक संकल्पना राबविण्यात येणार आहेत. सदर आराखड्याअंतर्गत सर्व कामे अत्यंत दर्जेदार करण्याचे ना. पंकजाताई मुंडे यांनी सूचित केले.

### एकल वापर प्लास्टिक बंदी विशेष अभियानाचा केला शुभारंभ

नगर परिषद पर्यावरण विभागाच्या वतीने बीड जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या एकल वापर प्लास्टिक बंदी अभियानाचा ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरण मंत्री या नात्याने शुभारंभ केला. हे अभियान १५ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविण्यात येणार असून याअंतर्गत जिल्ह्यातील शाळा, कॉलेज,व्यापारी वर्गात राबविण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील विविध आस्थापनांना प्लास्टिक बंदी बाबत माहिती देण्यात येणार आहे. दुकाने, आठवडी बाजार अशा ठिकाणी प्रबोधन देखील करण्यात येणार असून कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार आहे. या अभियानाअंतर्गत वृक्षारोपण करण्याच्या सूचना ना. पंकजाताई मुंडे यांनी विभागाला केल्या आहेत. पर्यावरण संवर्धनाचा संकल्प दृढ करणारे हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी अभियानात सहभागी होण्याचे ना. पंकजाताई मुंडे यांनी आवाहन केले.

# श्री संत मदन महाराज दिंडीचे पंढरपूरकडे उत्साहपूर्ण, भक्तीमय प्रस्थान

## कडा नगरी भक्तीरसात न्हाऊन निघाली; आषाढी वारीसाठी वारकऱ्यांचा प्रचंड उत्साह

### वारकरी सेवा मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**आष्टी प्रतिनिधी :**

"ज्ञानबा-तुकाराम..पांडुरंग हरी... विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल... माऊली.. माऊली " या अखंड नामघोषाने आणि टाळ-मृदंगाच्या मंगल निनादाने कडा नगरी बुधवारी भक्तीरसात न्हाऊन निघाली. आषाढी वारीच्या पवित्र परंपरेचे जतन करणाऱ्या कडा येथील श्री संत मदन महाराज संस्थानच्या पायी दिंडीचे पंढरपूरकडे अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तीमय आणि मंगल वातावरणात प्रस्थान झाले. विठ्ठलभक्तांच्या डोळ्यांत दर्शनाची ओढ, मुखी हरिनामाचा गजर आणि हृदयात पांडुरंग भेटीची आस अशी अवर्णनीय भक्तिभावाची अनुभूती या सोहळ्यात पाहायला मिळाली.

पालखी रथाची विधिवत पूजा व भव्य मिरवणूक

दिंडी प्रस्थानापूर्वी श्री संत मदन महाराज मठासमोर पालखी रथाची विधिवत पूजा,आरती आणि अभिषेक संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांच्या हस्ते संपन्न झाला.मंत्रोच्चार, हरिनामाचा गजर आणि विठ्ठलाच्या जयघोषात रथाला पुष्पहार अर्पण करून वारीचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर गावातील प्रमुख मार्गावरून पालखी रथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. घराघरांतून महिलांनी रांगोळ्या काढून, औक्षण करून आणि फुलांची उधळण करत दिंडीचे स्वागत केले.संपूर्ण परिसर भगव्या पताकांनी आणि विठ्ठलनामाने दुमदुमून गेला होता.

"पांडुरंगा, राज्यात सुकाळ नांदू दे!" वारकऱ्यांचे विठ्ठलचरणी साकडे यंदा पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत असले, तरी विठ्ठलाच्या चरणी साकडे घालण्यासाठी आणि "पांडुरंग कृपा कर, राज्यात सुख-समृद्धी नांदो, शेतकऱ्यांच्या शिवारात भरघोस पाऊस पडू दे" अशी प्रार्थना करण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी दिंडीत सहभागी झाले. "वारी म्हणजे भक्ती, समता, सेवा आणि संस्कारांचा महामेळा" याचा प्रत्यय या सोहळ्यात प्रत्येक क्षणी येत होता.

प्रत्येक वर्षाप्रमाणे कडा कृषी उत्पन्न बाजार



समितीचे सभापती रमजान तांबोळी व बबलुशेठ तांबोळी यांच्या वतीने या संपूर्ण दिंडीला नाश्ता देण्यात आला आणि ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. या दिंडीला शुभेच्छा देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, सरपंच युवराज पाटील,उपसरपंच दीपक कर्डिले, हेमंत पोखर्णा, माजी सभापती संजय ढोबळे, राजाबापू कर्डिले, बाळासाहेब कर्डिले, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य,माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, पत्रकार उत्तम बोडखे,रघुनाथ कर्डिले,राजेश राऊत,दिगंबर बोडखे,राजेंद्र तांगडे,सुभाष मामा सोनवणे, कड्याचे माजी सरपंच रामशेठ मधुरकर,अनिल तात्या ढोबळे, प्रा. डॉ. श्याम सांगळे, बंडू शिंदे,ह.भ.प. दादा महाराज चांगुणे,संतोष महाराज मोरे, भाऊसाहेब भोजने, रमेश भोजने,विकास धर्माधिकारी, लक्ष्मण कर्डिले, छगन कर्डिले, संपत कर्डिले, पांडुरंग कर्डिले, योगेश भंडारी,

पान २ वर



# आरोग्य सेवांचा गुणात्मक दर्जा वाढवावा

### एकात्मिक आरोग्य वर्धिनी समिती आढावा बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांची सूचना

**लातूर प्रतिनिधी**

लातूर ग्रामीण मतदार संघात ९५% आयुष्यमान आरोग्य कार्डचे वितरण झाल्याबद्दल समाधान व्यक्त करून ग्रामीण भागातील जनतेला केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांच्या दर्जात गुणात्मक आणि परिणामकारक वाढ करावी, सुविधांचे बळकटीकरण व्हावे आणि आरोग्य विषयक उपक्रम लोकाभिमुख करावेत यासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यरत राहावे अशी सूचना लातूर ग्रामीण विधानसभेचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केली आहे.

राज्य शासनाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या क्षेत्रासाठी आरोग्य विषयक नव्याने गठीत करण्यात आलेल्या एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची पहिली बैठक समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली १५ जुलै बुधवार रोजी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.

पान २ वर

# दुग्ध व्यवसायाला प्रधान व्यवसायाचे स्थान द्या; महाराष्ट्र देशातील सर्वोत्तम दूध उत्पादक प्रदेश : आ. सुरेश धस

## २० ते ३० गाईंच्या शास्त्रोक्त व्यवस्थापनातून जिल्हाधिकाऱ्यांच्या वेतनाइतके उत्पन्न शक्य : संदीप सिंग

**आष्टी ( प्रतिनिधी )**

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक, नैसर्गिक परिस्थिती आणि कष्टकरी शेतकरी यांच्यामुळे महाराष्ट्र राज्य हे दूध उत्पादन व्यवसायासाठी देशात सर्वोत्तम प्रदेश आहे त्यामुळे युवकांनी दूध उत्पादन हा पूरक व्यवसाय न समजता शेती पेक्षा प्रधान व्यवसाय समजून नियोजनबद्ध पद्धतीने दुग्ध व्यवसाय करावा असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले

तर वीस,तीस गाईंचे शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन करताना त्यांची लागवड, खाद्य खुराक आणि गोठ्याचे व्यवस्थापन केल्यास जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या वेतनाइतके आर्थिक उत्पन्न मिळू शकते असे प्रतिपादन पंजाब येथील प्रसिद्ध दुग्ध व्यवसायिक संदीप सिंग यांनी केले तर नियोजनबद्ध दुग्ध व्यवसाय केल्यास आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी तरतूद करता येईल असे प्रतिपादन हरप्रीत सिंग यांनी केले आष्टी येथील आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ यांचे वतीने दुग्ध उत्पादन वाढीविषयी मार्गदर्शन मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुरेश (आण्णा) धस होते. यावेळी व्यासपीठावर आमदार सुरेश (आण्णा) धस, पंजाबचे डेअरी तज्ज्ञ हरप्रीत सिंग, संदीप सिंग, वामन (दादा) गायकवाड,आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले,तानाजी हैदर, हनुमंत पंच, गणेश अंतरे (सोनगाव, ता. राहुरी), रामनाथ बदक (संगमनेर), प्रोग्रेसिव्ह बिल्डर फार्मर्स असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव जयवंत ताकणे, आधुनिक दुग्ध व्यवसाय तज्ज्ञ भरत (काका) गळभोर, आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघाचे संचालक, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की महाराष्ट्र राज्याची भौगोलिक नैसर्गिक परिस्थिती आणि कष्टकरी शेतकरी

### महाराष्ट्रही दूध उत्पादनात पंजाबच्या बरोबरीने पुढे जाऊ शकतो : हरप्रीत सिंग

यांच्यामुळे संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य हा सर्वोत्तम प्रदेश असल्यामुळे महाराष्ट्रातील युवक शेतकऱ्यांनी शेती हा प्रथम व्यवसाय न समजता दुग्ध व्यवसाय हा प्रथम व्यवसाय समजावा चांगल्या शेतकऱ्यांनी दूध उत्पादनाकडे वळावे आणि दुसऱ्या शेतकऱ्यांना देखील चांगले सांगावे आपापसात सहकार्य करावे दूध व्यवसाय सुरू करताना लागवडीसाठी दर्जेदार असलेले डब्ल्यू डब्ल्यू एस, एबीएस आरमाडा, ऑस्कर, रॅन्लर हे सेक्स सॉर्टेड सिमेन म्हणजे केवळ कालवडी जन्मतील असे सिमेन वापरावे याबाबत दूध उत्पादकांनी अत्यंत जागृत राहून दर्जेदार सिमेन वापरावे गाईंचे लागवडीपासून प्रसूतीपर्यंत खाद्याचे खुराक प्रोटीन मिनरल मिक्स्चर याबाबतचे मार्गदर्शन घेऊन चांगल्या कालवडीची निर्मिती करावी अशा पद्धतीने आज गाय 20 लिटर दूध देत असेल तर होणारी कालवड ही 25 ते 30 लिटर दूध देऊ शकते संदीप सिंग आणि हरप्रीत सिंग या बंधूंनी अतिशय शून्यातून दुग्ध व्यवसाय सुरू केला असून या व्यवसायात त्यांनी मोठी झेप घेतली आहे त्यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील दूध उत्पादकांनी दूर व्यवसायासाठी वाढीसाठी मार्गदर्शन घ्यावे आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ त्यासाठी सदैव तयार आहे चांगल्या दर्जेदार गाई निर्मिती झाल्यानंतर पुढील काही दिवसांमध्ये दुग्ध व्यवसायाला अतिशय चांगले दिवस येणार असून गाईंची किंमत वाढणार आहे आणि दुधाची देखील किंमत वाढणार आहे त्यामुळे युवक शेतकऱ्यांनी शेती हा प्रथम व्यवसाय न समजता दुग्ध व्यवसाय हा प्रथम समजावा असे प्रतिपादन त्यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वच दूध उत्पादक हे भेसळ करत नसून काही निर्लज्ज भामटे दूध भेसळीची भडवेगिरी करत आहेत हे दूध व्यवसायासाठी अत्यंत धोकादायक असून अन्न व औषधी विभागाचे आयुक्त परी कारभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी या दूध भेसळीविरुद्ध कठोर कारवाई केली त्याबद्दल त्यांची कामगिरी अभिनंदन आहे असे त्यांनी शेवटी सांगितले संदीप सिंग यावेळी बोलताना म्हणाले की गाईंच्या आवश्यकतेनुसार त्यांना खाद्य पुरवावे शक्य द्यावे दहा दिवसाच्या अगोदरचे पशुखाद्य हे बुरशी आल्यामुळे मारक ठरू शकते अनेक पशुखाद्य कंपन्या या युरियाचा वापर करत आहेत त्यामुळे गाईंच्या आरोग्यासाठी धोका असल्यामुळे त्यापासून दूध उत्पादकांनी काळजी घेणे आवश्यक आहे आपण तयार करत असलेल्या कालवडी गाई यांचे पासून 05 ते 06 वेत मिळवायचे असून मुरघास हा चांगल्या पद्धतीने तयार केल्यास 90% फायदा होतो दूध उत्पादकांनी सामूहिक पद्धतीने आपापले अनुभव शेअर करून एकमेकांना मदत केली पाहिजे सध्या बाजारात 35 टक्के दूध हे नकली असल्यामुळे गंभीर परिस्थिती आहे 20,30 गाईंपासून चांगल्या पद्धतीने ब्रीडिंग फीडिंग आणि गोठ्याचे मॅनेजमेंट केल्यास जिल्हाधिकारी इतक्या पगाराचे आर्थिक नियोजन होऊ शकते त्यामुळे युवक शेतकऱ्यांनी या व्यवसायाकडे पाहावे केवळ पंजाबच नव्हे तर महाराष्ट्रात देखील दूध उत्पादनास चांगला वाव असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले

यावेळी बोलताना हरप्रीत सिंग म्हणाले की देशात दूध उत्पादनामध्ये स्पर्धा निर्माण झाली असून सहकारी संस्थांद्वारे डेरी फार्मिंग ही तामिळनाडू पंजाब महाराष्ट्र कर्नाटक आंध्र प्रदेश या




राज्यांमध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू असून दूध व्यवसाय हा उत्तम अत्याधुनिक पद्धतीने केला पाहिजे पारंपारिक पद्धतीचे गोठे आता बंद केले पाहिजे व्ही टाईप गोठे तयार करून त्यातून उष्णता आणि वायू बाहेर पडला पाहिजे गोठ्याची स्वच्छता हा सर्वात मोठा घटक असून गाईचा खुराक हा अत्यंत शास्त्रज्ञ पद्धतीने दिला पाहिजे गाईच्या मर्जीनुसार खाद्य दिले पाहिजे गाईच्या लागवडीसाठी ब्रीडिंग फीडिंग आणि मॅनेजमेंट नुसार व्यवस्थापन केल्यास एका गाईपासून दहा महिन्यांमध्ये 4 लाख 73 हजार रुपये किमतीचे दूध तयार होते हे आम्ही सिद्ध केले असून मुरघास स्टार्च हे पीठ तयार करून दिले पाहिजे तसेच गाय ही 12 तास बसून राहिली पाहिजे तिच्या रवंथ करण्यामुळे दूध उत्पादनात वाढ होत असून माणूस आपल्या गरजांची जशी पूर्तता करतो त्याच पद्धतीने गाईंचे गरजाची पूर्तता केल्यास गाईपासून आर्थिक उत्पन्न निर्माण करून आपली गरज भागवली जाते असे अनुभवास येत आहे असे सांगत 90 टक्के शेतकऱ्यांना दूध व्यवसायाचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास नसल्यामुळे थोड्या परिश्रमातून शास्त्रोक्त पद्धतीने आम्ही केलेल्या कामाचे व्हिडिओ पाहून शेतकऱ्यांनी दूध उत्पादन वाढवावे कारण दूध हा अत्यंत आवश्यक पदार्थ असून जगावर कितीही संकट आले तरी दूध हे मानवी जीवनातला सर्वात मोठा अन्नघटक आहे हे आपण कोविड-19 काळात देखील अनुभवले आहे असे सांगत ते पुढे म्हणाले की संदीप सिंग आणि आपण शून्यातून दूध व्यवसाय निर्माण केला असून सन 2016 मध्ये 03 गाई त्याही प्रत्येकी 15 लिटरच्या असलेल्या अशा गाईंपासून व्यवसायाची सुरुवात केली आहे आज 4.00 कोटी रुपये चा व्यवहार होत आहे . महाराष्ट्र राज्य उत्पादनामध्ये दुसरा पंजाब होऊ शकतो असे त्यांनी शेवटी सांगितले.




# लोककल्याणकारी सेवा पंधरवडा` शुभारंभ; धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त विशेष स्वच्छता अभियानाने झाली सुरुवात

## आ. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त धार्मिक स्थळी पुजा, प्रार्थना व महापुरुषांना अभिवादन

**परळी वैजनाथ(प्रतिनिधी)**

परळी वैजनाथ नगर परिषदेच्या वतीनेमाजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे आणि पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित "लोककल्याणकारी सेवा पंधरवडा" उपक्रमाचा शुभारंभ बुधवारी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला.माजी मंत्री तथा परळीचे लोकप्रिय आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त सेवा पंधरवड्याची सुरुवात विशेष स्वच्छता अभियानाने करण्यात आली.


या अभियानांतर्गत नगर परिषद मुख्यालय, उपजिल्हा रुग्णालय परिसर, न्यायालय परिसर, तहसील कार्यालय परिसर तसेच शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणे, ओपन स्पेसेस, कचरा साचणारी ठिकाणे, रस्त्यांच्या कडेला असलेले भाग आणि नागरिकांच्या दैनंदिन वापरातील परिसरांची व्यापक स्वच्छता हाती घेण्यात आली. लोककल्याणकारी सेवा पंधरवडा अंतर्गत पुढील काही दिवस विविध जनहितकारी, पर्यावरणपूरक, आरोग्य विषयक, सामाजिक आणि लोकसेवेचे उपक्रम राबविण्यात येणार असून, प्रत्येक उपक्रमातून समाजहिताचा संदेश दिला जाणार आहे. "माझे शहर – स्वच्छ शहर, सुंदर शहर" हा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, स्वच्छता ही केवळ नगर परिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. नागरिकांनीही स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेऊन परळी शहर स्वच्छ, निरोगी व सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी याप्रसंगी केले.

**आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त धार्मिक स्थळी पुजा,प्रार्थना व महापुरुषांना अभिवादन**

माजी मंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी शहरात विविध सामाजिक, धार्मिक आणि जनकल्याणकारी उपक्रम उत्साहात सुरु करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच परळी नगर परिषदेच्या वतीने आयोजित कार्यक्रमांना कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सकाळी प्रभू वैद्यनाथ मंदिरात अभिषेक करण्यात आला. प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या उत्तर घाट येथे परळी नगर परिषदेच्या वतीने आयोजित "लोककल्याणकारी सेवा पंधरवडा" उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. त्याचबरोबर उमर शाहवली दर्गा तसेच मलिकपुरा दर्गा येथे चादर अर्पण करून प्रार्थना करण्यात आली. शहरातील विविध ठिकाणी महापुरुषांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांमध्ये कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, न.प. गटनेते वैजनाथ सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष आयुब खान पठाण, श्रीकृष्ण उर्फ भावड्या कराड अजीज कच्छी, रमेश पवार, हाजी बाबू, रवी मुळे, नंदकिशोर मुंडे, माऊली चीकणे, उत्तम मोरे, प्रा. अशोक चव्हाण, के.डी. उपाडे , साहेबराव फड, राजेंद्र सोनी, राजकुमार डाके, संजय देवकर,दीपक कुरील, भागवत गीते, बळीराम नागरगोजे, गिरीश भोसले, चंद्रप्रकाश हालगे, गणेश सुरवसे, तकी खान, सद्दाम पठाण, एजाज शेख आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते, न.प. अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## श्री संत मदन महाराज दिंडीचे पंढरपूरकडे उत्साहपूर्ण, भक्तीमय प्रस्थान

पान १ वरुन

गोरख कर्डिले, सुरेश कर्डिले, बजरंग कर्डिले, राजू शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, महिला, युवक आणि वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांनी टाळ-मृदंगावर हरिनामाचा गजर करत वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. वारी ही केवळ पायी चालण्याची परंपरा नसून सेवा, समर्पण आणि सहकार्याची सं स्कृती आहे, याचे दर्शनही या प्रवासात घडले. शेरी बु.येथे पांडुरंग नाथ यांच्यावतीने दिंडीतील वारकऱ्यांसाठी प्रेमपूर्वक महाप्रसाद व भोजनाची व्यवस्था करण्यात आली. दिंडीतील वारकऱ्यांसाठी वारकरी सेवा मो फ त आरोग्य तपासणी शिबिर श्री संत मदन महाराज देवस्थानच्या आषाढी एकादशी पायी दिंडी सोहळ्याचे पंढरपूरकडे अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात प्रस्थान झाले. देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांच्या नेतृत्वाखाली हा पारंपरिक पायी दिंडी सोहळा पंढरीच्या दिशेने रवाना झाली आहे. 'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'संत मदन महाराज की जय'च्या जयघोषाने संपूर्ण कडानगरी विठ्ठलमय झाली होती.पायी दिंडी प्रस्थानाच्या या पवित्र प्रसंगी वारकरी व भाविकांसाठी वारकरी सेवा मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

## आरोग्य सेवांचा गुणात्मक दर्जा वाढवावा

या बैठकीस समिती सदस्य जि.प. महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पं.स. सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, लातूर पं.स. सभापती श्रीकांत बैले, जि.प. सदस्य महादेव साळुंके, सौ. आशाताई भिसे, सौ. छायाताई चिंचोलकर, सौ. राजश्री देशमुख, सौ. अश्विनी शिंदे, महादेव मस्के, सौ. सोनाली थोरमोटे, सौ. भागीरथी पाटील, सौ. दीप्ती आदमाने, जि.प. सां. बा. उप अभियंता सुभाष कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक सारडा, रेणापूर ग्रामीण रुग्णालय अधीक्षक सौ. ए. बी. अलगुले, बाभळगाव ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. एस. एस. बालकुंदे, मुरुड ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजाभाऊ गलांडे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, औसा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर, समिती सचिव लातूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आर. एच. पवार, सहसचिव रेणापूर तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी यांच्यासह संबंधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

लातूर ग्रामीण मतदार संघातील प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, इमारतीची अवस्था, आरोग्याच्या सुविधा, प्रयोगशाळा, अधिकारी, कर्मचारी, आरोग्य सेविका, मनुष्यबळ, आयुष्यमान आरोग्य कार्ड, कुटुंब कल्याण योजना, स्वच्छतागृह, पाणीपुरवठा, रिक्त पदे याबाबतचा सविस्तर आढावा समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी घेतला. आरोग्य सेविकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत त्याचबरोबर जीर्ण झालेल्या आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती आणि नव्याने इमारत बांधकाम यासाठी राज्याचे आरोग्य मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

जनतेचे आरोग्य सदृढ राहावे यासाठी आरोग्स सुविधा सक्षम असल्या पाहिजेत त्या साठी लागणाऱ्या भौतिक व सर्वप्रकारच्या सोयी सुविधा कमी पडू दिल्या जाणार नाहीत तेंव्हा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी समजून काम करावे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, अंगणवाडी, बालवाडी सह शालेय विद्यार्थ्याच्या आरोग्य तपासणी बरोबरच वयोगट १४ ते १५ दरम्यानच्या मुलींना गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यासाठी जनजागृती करावी असे बोलून दाखवले.

या बैठकीत समिती सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित करून अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या तर रेणापूर, लातूर तालुका आणि भादा सर्कलसह लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रातील आरोग्य यंत्रणा, सोयीसुविधेची सविस्तर माहिती संबंधित तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिली. बैठकीचे सुत्रसंचलन आरोग्य सहा. प्रशांत शेटे यांनी केले.

या बैठकीस भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, शरद दरेकर, पांडुरंग बालवाड, भागवत सोट, अनिल भिसे, राजकिरण साठे, हनुमंत गव्हाणे यांच्यासह अनेक जण होते. प्रारंभी समिती अध्यक्ष आणि सदस्यांचा आरोग्य विभागाच्या वतीने यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# आषाढी वारीतील पारंपरिक नीरा स्नान सोहळ्यात संत ज्ञानेश्वर माउलींच्या पवित्र पादुकांना नीरा नदीत विधीवत स्नान

## "माऊली-माऊली"च्या जयघोषात हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत भक्तिमय सोहळा पार पडला







आषाढी वारीतील सर्वाधिक भावस्पर्शी आणि परंपरागत विधींपैकी एक असलेला संत ज्ञानेश्वर माउलींच्या पादुकांचा नीरा स्नान सोहळा आज भक्तिभावाच्या वातावरणात संपन्न झाला. नीरा नदीच्या दत्तघाटावर वेदमंत्रांच्या घोषात पादुकांना पवित्र जलाने अभिषेक करण्यात आला. यावेळी "ज्ञानोबा-तुकाराम" आणि "माऊली-माऊली"च्या अखंड जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

वाल्हे येथील मुक्कामानंतर संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी नीरा येथे दाखल झाली. परंपरेनुसार पालखीतून पवित्र पादुका बाहेर काढून धार्मिक विधींच्या साक्षीने त्यांचे नीरा नदीत स्नान घालण्यात आले. या सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी नदीच्या दोन्ही तीरांवर हजारो वारकरी आणि भाविकांनी मोठी गर्दी केली होती. टाळ-मृदुंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि वारकऱ्यांच्या भक्तिभावामुळे संपूर्ण परिसर अध्यात्मिक वातावरणाने भारावून गेला.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील नीरा स्नान हा अनेक दशकांपासून जपला गेलेला महत्त्वाचा धार्मिक विधी मानला जातो. पुणे जिल्ह्याची सीमा ओलांडून सातारा जिल्ह्यात प्रवेश करण्यापूर्वी पादुकांना नीरा नदीत स्नान घालण्याची परंपरा आजही श्रद्धेने पाळली जाते. या पवित्र क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक नीरा येथे दाखल झाले होते.

नीरा स्नानाचा विधी पूर्ण झाल्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा पुढील मुक्कामासाठी लोणंदकडे मार्गस्थ झाला. मार्गभर विविध ठिकाणी ग्रामस्थांनी फुलांची उधळण करत आणि हरिनामाच्या गजरात पालखीचे उत्स्फूर्त स्वागत केले. भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचा संगम अनुभवायला मिळाल्याने संपूर्ण परिसर वारकरी भावनेने भारावून गेला.

## शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांच्या उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष चिंताजनक!

ज्या क्षेत्रातून देश तयार होतो आणि युवा पिढीचे भविष्य निर्माण होते व लहानाचा मोठा होतो.अशा क्षेत्रात जर पेपर लिक होत असेल आणि त्याचे उत्तरदायित्व सरकार स्विकारण्यास तयार नसेल तर ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही.कारण पेपर फुटी हा विद्यार्थांच्या भविष्यावर मोठा धब्बा असुन, घणाघाती प्रहार आहे.कारण नीट पेपर लिक प्रकरणात २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या ही देशाला आणि शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना आहे एवढी मोठी घटना होऊनही याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.याला वाचा फोडण्यासाठी वांगचूक समोर आले आहे.परंतु सरकार त्यांच्याकडे गांभीर्याने लक्ष देण्यास तयार नाही.देशात एवढे मोठे नीट पेपर लिक प्रकरण झाले. परंतू याची जबाबदारी सरकार तिळमात्र स्विकारण्यास तयार नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. सीजेपीने सुरू केलेल्या आंदोलनाचा २५ वा,तर वांगचुक यांच्या उपोषणाचा १७ वा दिवस १४ जूलैला पूर्ण झाला.अशा परिस्थितीत सरकारने या आंदोलनाकडे दुर्लक्ष न करता, लोकशाहीच्या हिताचा मान ठेवून सीजेपी सोबत चर्चा करणे आवश्यक आहे. सीजेपीच्या मागण्या काय आहे तो नंतरचा प्रश्न.परंतु जनहितार्थ व विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोणातुन आणि देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावनांचा सन्मान व्हावा या दृष्टीने देशापुढे सत्य आणण्यासाठी सरकारची वांगचुक यांच्या उपोषणाच्या बाबतीत चर्चा करणे अत्यंत गरजेचे आहे. सीजेपीच्या प्रमुख मागण्यामध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा व परीक्षा गैरव्यवहारांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रूपयांची भरपाई द्यावी व अन्य मागण्या सीजेपीच्या आहेत.या मागण्याच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करून तातडीने आंदोलकांशी संवाद साधून चर्चा केली पाहिजे.कारण नीट पेपर असो अथवा टीईटी पेपर फुटी असो यामुळे शिक्षण क्षेत्राची मोठ्या प्रमाणात बदनामी व नाचक्की झाली आहे आणि होत आहे. शिक्षणतज्ज्ञ आणि हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी लढा देण्याची शपथ घेतली आहे आणि त्या अनुषंगाने त्यांनी देशाची राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे उपोषण सुरू केले.परंतु सरकार त्यांच्या उपोषणाबद्दल कोणत्याही प्रकारची दखल घेत नसल्याचे स्पष्ट दिसून येते. परंतु सरकारची मुजोरी आणि शिक्षणाबद्दलची अवहेलना पहाता सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण तात्पुरते मागे घेऊन व सर्वांना संघटित करून वेगळ्या मार्गाने लढा दिला पाहिजे. कारण "जाण है तो जहान है"हा मुलमंत्र अंगिकारून पुढील पाऊल उचलावे.कारण आज देशाला सोनम वांगचुक सारख्या शिक्षणतज्ज्ञाची मोठी गरज आहे.त्यामुळे उपोषण मागे घेऊन वेगळ्या पद्धतीने लढा उभा करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. आतापर्यंत जीतकेही पेपर फुटले ते सर्व भ्रष्टाचाराच्या माध्यमातूनच फुटले आहेत.याकरीता सरकार जोपर्यंत भ्रष्टाचार संपविण्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करत नाही, तोपर्यंत सर्वच बाबतीत मनमानी,अनियंत्रितपणा आणि चुकीच्या निर्णयाचे हे चक्र सुरूच राहील.हा केवळ शिक्षण व्यवस्थेवरच नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजावर एक कलंक आहे.जेव्हा परीक्षेचे पेपर फुटतात तेव्हा तुम्हाला डॉक्टर आणि इंजिनिअर कसे मिळणार?हेच डॉक्टर जे पेपर फुटीतुन कॉपी करून पास झाले आहेत,ते देशातील जनतेचा उपचार करतील आणि इंजिनिअर तुमच्या इमारती बांधतील, ज्यामुळे इमारती धाराशाही होऊन जीवितहानी होईल आणि डॉक्टरच्या चुकीच्या निर्णयामुळे जिवीत हाणी सुद्धा होऊ शकते यालाही नाकारता येत नाही.

हा सर्व प्रकार पेपर फुटीतुन उत्पन्न होतो. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञ श्री सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचे महत्व समजून आणि त्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून सरकारने तातडीने पाऊल उचलले पाहिजे. कारण आंदोलकांचे योग्य समाधान व्हावे हीच आमची इच्छा.जय हिंद!



**लेखक- रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# परळी विधानसभा मतदारसंघात विशेष मतदार पुनर्निरीक्षण मोहिमेला वेग; 38 टक्के काम पूर्ण

## नागरिकांनी बीएलओंना सहकार्य करुन गणना प्रपत्र भरुन घावे – तहसीलदार विनोद रणवरे

**परळी | प्रतिनिधी**





केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष मतदार पुनर्निरीक्षण (Special Intensive Revision – SIR) अभियानाला परळी विधानसभा मतदारसंघात चांगला प्रतिसाद मिळत असून, दि. 15 जुलैपर्यंत सुमारे 38 टक्के कामकाज पूर्ण झाले आहे, अशी माहिती तहसीलदार विनोद रणवरे यांनी दिली.

या अभियानांतर्गत बूथ लेव्हल अधिकारी (BLO) मतदारांच्या घरोघरी जाऊन गणना प्रपत्र (Enumeration Form) भरून घेत आहेत. मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हे विशेष पुनर्निरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमेत महसूल विभागासह विविध शासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विनोद रणवरे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण यंत्रणा कार्यरत आहे. या अभियानात परळी तहसील कार्यालयातील संतोष वानखेडे, तृप्ती उंबरे, महसूल सहाय्यक दिगंबर शिनगारे यांच्यासह विविध बीएलओ सक्रियपणे काम करत आहेत.

यामध्ये बीएलओ लालचंद मोहनराव सुरोडवार, शुभम जाधव, संभाजी बिराजदार, शिनगारे, दशरथ तुकाराम जगतकर तसेच भाजपाचे नगरसेवक तथा बीएलओ-२ अश्विन आघाव, भाजपा बूथ प्रमुख अमोल शिंदे, गोविंद मुंडे आणि अन्य कार्यकर्ते व अधिकारी मतदारांच्या घरी भेट देऊन गणना प्रपत्र भरून घेण्याचे काम करत आहेत.

तहसीलदार विनोद रणवरे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, बीएलओ आपल्या घरी भेट देताच त्यांना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. मतदार यादीत अचूक नोंद राहण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या विशेष पुनर्निरीक्षण मोहिमेला सक्रिय सहकार्य करावे.

विशेष मतदार पुनर्निरीक्षण अभियानामुळे मतदार यादीतील त्रुटी दूर होण्यास, नव्या पात्र मतदारांची नोंद होण्यास तसेच लोकशाही प्रक्रियेला अधिक बळकटी मिळण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### लोकजागर

# लोकसेवार्थ : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्वसमावेशक नवोपक्रम हेच विकसित भारत 2047चे प्रमुख आधारस्तंभ: डॉ. रघुनाथ माशेलकर

भारताने जगासाठी परवडणारे, उच्च दर्जाचे आणि कोट्यवधी नागरिकांच्या जीवनात परिवर्तन घडवणारे तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिल्यास डीप-टेक, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्वसमावेशक नवोपक्रम हे विकसित भारत २०४७चे सर्वात महत्त्वाचे आधारस्तंभ ठरतील, असे प्रतिपादन पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, रॉयल सोसायटीचे फेलो तसेच वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदचे माजी महासंचालक यांनी मुंबई येथे आयोजित फिक्की लिजेंड्स सिरीज अंतर्गत "नवोन्मेशाद्वारे यश ,उद्योग आणि समाजासाठीचे धडे " या विषयावरील व्याख्यानात केले.




उद्योगजगताचे नेते, उद्योजक, धोरणकर्ते, वैज्ञानिक, संशोधक आणि नवोपक्रम क्षेत्रातील तज्ज्ञांना संबोधित करताना डॉ. माशेलकर म्हणाले की, भारताने आता केवळ जागतिक तंत्रज्ञानाचा वापर करणारा देश न राहता डीप सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सरकार-उद्योग यांच्या भक्कम भागीदारीच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे नवोपक्रम निर्माण करणारा देश बनले पाहिजे.

आपल्या जागतिक स्तरावर प्रसिद्ध "More from Less for More" या तत्त्वज्ञानाविषयी बोलताना डॉ. माशेलकर म्हणाले की, कमी संसाधनांचा वापर करून अधिक दर्जेदार आणि कार्यक्षम उत्पादने व तंत्रज्ञान विकसित करणे आणि ते सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देणे, हीच भारतासमोरील सर्वात मोठी संधी आहे. त्यांनी सांगितले की, नवोपक्रमाचे मूल्यांकन आता केवळ तांत्रिक गुंतागुंत किंवा महागड्या उत्पादनांच्या आधारे न करता, समाजासमोरील मोठ्या समस्यांचे व्यापक स्तरावर निराकरण करण्याच्या क्षमतेच्या आधारे केले पाहिजे. उत्कृष्टता, परवडणारी किंमत आणि सर्वसमावेशकता हे भारताच्या नवोपक्रम मॉडेलचे तीन प्रमुख स्तंभ बनले पाहिजेत.

डॉ. माशेलकर म्हणाले की, मर्यादित संसाधने असूनही भारताने अनेक जागतिक दर्जाचे नवोपक्रम घडवून आणले आहेत. परवडणारी आरोग्यसेवा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, एआय-आधारित निदान प्रणाली आणि डीप-टेक स्टार्टअप्स ही त्याची उत्तम उदाहरणे आहेत. स्मार्टफोनद्वारे क्षयरोगाचे निदान, थर्मल इमेजिंगद्वारे स्तनाच्या कर्करोगाची तपासणी, डिजिटल मातृ आरोग्य सेवा आणि रक्त न काढता ॲनिमियाचे निदान करणारी तंत्रज्ञान प्रणाली यांसारख्या नवकल्पना "More from Less for More" या तत्त्वज्ञानाचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले.भारतीय उद्योगांना आवाहन करताना डॉ. माशेलकर म्हणाले की, आता केवळ जागतिक सर्वोत्तम पद्धतींचे अनुकरण करण्याऐवजी जगासाठी नवीन कार्यपद्धती निर्माण करण्याची वेळ आली आहे. भारतातील डिजिटल क्रांती, स्वस्त डेटा सेवा, डीप-टेक उद्योजकता आणि हरित हायड्रोजन उपक्रमांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, या क्षेत्रांमध्ये भारताने जागतिक नेतृत्व करण्याची क्षमता सिद्ध केली आहे. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेबाबतही महत्त्वपूर्ण भूमिका मांडत सांगितले की, "कृत्रिम बुद्धिमत्ता ही 'को-पायलट' असावी, 'ऑटोपायलट' नव्हे," म्हणजेच मानवी विवेक, नैतिकता आणि संवेदनशीलता या तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी कायम राहिल्या पाहिजेत.

### ■ प्रासंगिक : गझल सम्राज्ञी बेगम अख्तरांना संगीतमय श्रद्धांजली 'शाम ए अख्तरी'

भारतीय शास्त्रीय संगीत आणि गझल प्रेमींसाठी एक संध्याकाळ अतिशय रोमांचक आणि तितकीच संसमरणीय असणार आहे. सुप्रसिद्ध गझल सम्राज्ञी बेगम अख्तर यांना श्रद्धांजली पर अशा त्यांचाच गाजलेल्या गझलांवर आधारित शाम ए अख्तरी या कार्यक्रमाचे आयोजन मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर येथील मिनी सभागृहात येत्या १८ जुलै रोजी रात्री ८ वाजता केले गेले आहे. हा गझलांचा कार्यक्रम बेगम अख्तर यांच्या संगीतमय कारकिर्दीला समर्पित केला गेला आहे. या वार्षिक संगीतमय कार्यक्रमाचे संचालन मधू मुरचाना च्या संस्थापिका आणि प्रख्यात गायिका पदमश्री डॉ. सोमा घोष करणार आहेत. डॉ. घोष आपल्या सुमधुर आणि भावपूर्ण प्रस्तुतीतून बेगम अख्तर यांच्या गझलांना स्वरांजली अर्पण करणार आहेत.

**संकलन –संयोजन**
**सुबोध रणशेवरे**

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, गुरुवार, 16 जुलै 2026

Last page




## आ.धनंजय मुंडे यांचा वाढदिवस

# परळीत घरकुलाच्या स्वप्नांना मिळाला नवा आधार !

### प्रधानमंत्रीआवास योजना २.० : 270 लाभार्थ्यांच्या खात्यावर प्रत्येक १ लाख रु. हप्ता जमा





**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

नगर परिषद परळी वैजनाथच्या वतीने माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे आणि पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत 'लोककल्याणकारी सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. या लोककल्याणकारी सेवा पंधरवडा अंतर्गत माजी मंत्री तथा परळीचे लोकप्रिय आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त परळी वैजनाथ नगर परिषदेमार्फत प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत 270 पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरण द्वारे प्रत्येकी ₹1 लाखांचा पहिला हप्ता जमा करण्यात आला.

नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते तसेच नगर परिषदेचे पदाधिकारी व अधिकारी यांच्या उपस्थितीत हा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला. यावेळी लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त करत स्वतःच्या हक्काच्या घराच्या स्वप्नाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याची भावना व्यक्त केली. परळी वैजनाथ नगर परिषदेला प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत एकूण 677 घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. यापूर्वी 117 लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्यात आला होता. त्यानंतर आज आणखी 270 लाभार्थ्यांच्या खात्यावर पहिल्या हप्त्याची रक्कम यशस्वीपणे जमा करण्यात आली. उर्वरित पात्र लाभार्थ्यांनाही लवकरात लवकर पहिला हप्ता मिळावा, यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया वेगाने सुरू असल्याची माहिती नगर परिषद प्रशासनाने दिली. प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित, सन्मानाचे आणि स्वतःचे घर हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून परळी वैजनाथ नगर परिषद कार्यरत असून, शहरातील एकही पात्र कुटुंब घरकुलापासून वंचित राहू नये यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी सांगितले. लोककल्याणकारी सेवा पंधरवडा हा केवळ कार्यक्रमांचा उत्सव नसून जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारा आणि लोकसेवेचा विचार प्रत्यक्षात उतरविणारा उपक्रम असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

### केक कापून हा धनंजय मुंडे यांचे अभिष्टचिंतन

**दरम्यान, यावेळी आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त नगराध्यक्षा व उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या शुभहस्ते केक कापून अभिष्टचिंतन करण्यात आले.लोक कल्याणकारी सेवा पंधरवाड्या अंतर्गत नगर परिषदेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी वाढदिवसानिमित्त आमदार धनंजय मुंडे यांना शुभेच्छा व्यक्त केल्या.**

या कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे, नगरसेविका सौ.अर्चना रोडे,नगरसेवक रमेश पवार,प्रितेश तोतला, प्रणव मराठे आदींसह न.प.अधिकारी, कर्मचारी, घरघुल लाभार्थी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### 'लोकसंख्या व्यवस्थापन: शिक्षण आणि विकास' या विषयावर

## मुक्त विद्यापीठ यशवाणी वेब रेडीओवर ज्ञानसत्र संपन्न

**नाशिक (प्रतिनिधी)**

जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त 'लोकसंख्या व्यवस्थापन : शिक्षण आणि विकास' या विषयावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडीओवर विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे ज्ञानसत्र संपन्न झाले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची संकल्पना व प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सदर ज्ञानसत्र घेण्यात आले. अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या ज्ञानसत्राचे समन्वयन केले.




त्यात सहभागी प्रथम परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी 'लोकसंख्या : विकासाचा पाया की आव्हान?' या मुद्द्याचे विस्तृत विवेचन केले. द्वितीय सहभागी डॉ. सुनील भारोडकर यांनी 'लोकसंख्या व राष्ट्रीय मानवी शक्ती' हा मुद्दा अधोरेखित केला. डॉ. विशाल आंबेडकर यांनी अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकसंख्यावाढीचा आढावा सादर केला. परिसंवादात लोकसंख्या वाढ, वाढते शहरीकरण, आधुनिक जीवनशैली, महानगरांची वाढ, आरोग्यसेवा, शिक्षण, विकास प्रक्रियेवरील प्रभाव याविषयी सांगोपांग चर्चा करण्यात आली. श्री. राजू रसाळ यांनी महाकवी वामनदादा कर्डक यांची 'माणसा इथे मी तुझे गीत गावे' ही कविता सादर केली. हा कार्यक्रम अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यापीठ दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जयदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रज्ञ श्री. प्रकाश सापनर, श्री. गिरीश गवळी आणि श्री. दीपक राजगिरे यांनी विशेष योगदान दिले.

# ऐतिहासिक निर्णयांचा धडाका; अंबाजोगाईतील साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती यंदा वर्गणीमुक्त, डीजेमुक्त आणि साहित्यदिंडीने गाजणार!

### साठेनगर-परळवेस बैठकीत अभूतपूर्व निर्णय; 'वर्गणी देणार-घेणार' यांच्यावर कारवाईचा इशारा

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील साठेनगर-परळवेस येथे लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित बैठकीत यंदाच्या जयंतीबाबत अनेक ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेण्यात आले. या निर्णयांचे शहरासह संपूर्ण बीड जिल्ह्यातून सोशल मीडियावर आणि दूरध्वनीद्वारे मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे.

बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले की, यंदाची अण्णाभाऊ साठे जयंती पूर्णपणे वर्गणीमुक्त असेल. शहरात किंवा बाहेरून कोणाकडूनही वर्गणी गोळा केली जाणार नाही. जयंती लोकसहभागातून आणि नियोजनबद्ध पद्धतीने साजरी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

तसेच, जयंती डीजेमुक्त साजरी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ध्वनीप्रदूषणाला आळा घालत सांस्कृतिक आणि वैचारिक वातावरणात जयंती साजरी करण्यावर भर देण्यात आला आहे.

याशिवाय, १ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई शहरातून भव्य साहित्य दिंडी काढण्यात येणार असून, अण्णाभाऊ



साठे यांच्या साहित्याचा आणि सामाजिक विचारांचा जागर करण्यात येणार आहे. ही दिंडी जयंतीचे प्रमुख आकर्षण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

बैठकीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे वर्गणीबाबतचा कठोर निर्णय. आयोजकांनी स्पष्ट केले की, कोणाकडूनही वर्गणी मागितली जाणार नाही. तसेच वर्गणी देणे किंवा घेणे आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याची भूमिका समितीने घेतली आहे.

**कार्यकारिणी जाहीरः-अध्यक्ष** : पंकज भैया मस्के,उपाध्यक्ष : शिवाजी बालासाहेब जोगदंड सचिव : लखन अरुण जोगदंड सहसचिव : केशव बळीराम जोगदंड

**कोषाध्यक्ष** : भीमाशंकर नवनाथ शिंदे सहकोषाध्यक्ष : मल्हारी अंकुश जोगदंड

**मार्गदर्शक** :नगरसेवक मालुभैय्या जोगदंड,भारत भैय्या जोगदंड,संजय जोगदंड,विशाल वसंत नरसिंगे,विलास बाबुराव घोलप,खंडू नागनाथ वाघमारे,महादू राम माने,राजकुमार प्रकाश जोगदंड, बाबू रोहिदास जोगदंड,

बैठकीत उपस्थित नागरिकांनी या निर्णयांचे स्वागत करत, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना साजेशी, शिस्तबद्ध, सामाजिक आणि साहित्यप्रधान जयंती साजरी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यंदा वर्गणीमुक्त, डीजेमुक्त आणि साहित्यदिंडीच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्याचा अंबाजोगाईचा हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यासाठी आदर्श ठरणार, अशी भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली.

# मारहाणीच्या गुन्ह्याचे खुनात रूपांतर; विट मारून गंभीर जखमी; महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

**अंबाजोगाई |** अंबाजोगाई शहरातील चनई येथील वडारवस्ती परिसरात किरकोळ वादातून झालेल्या मारहाणीच्या घटनेत गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. या घटनेनंतर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 103(1) (खून) ची वाढ करण्यात आली असून, चार जणांविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चनई वडारवस्ती, किरमाणी दर्ग्याच्या पाठीमागे राहणाऱ्या राणी बालाजी राठोड (वय 31) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, 10 जुलै 2026 रोजी दुपारी त्या शेळ्या चारण्यासाठी खदाणीजवळ गेल्या असताना परिसरातील महिलांमध्ये सुरू असलेल्या वादानंतर सुभाष लष्करे यांनी त्यांच्या अंगावर धाव घेत त्यांना ढकलून चापट मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यावेळी वाद सोडविण्यास आलेल्या त्यांच्या नातेवाईकालाही मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी, 11 जुलै रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास राणी राठोड यांच्या आई यशोदा बालाजी राठोड यांनी सुभाष लष्करे यांना मुलीला विनाकारण मारहाण का केली, असा जाब विचारला. त्यावरून दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. फिर्यादीनुसार, यावेळी सुभाष लष्करे, त्यांची पत्नी मंदाकिनी, तसेच मुलगे विश्व आणि ईंद्र यांनी शिवीगाळ व मारहाण केली.

वाद सुरू असताना सुभाष लष्करे यांनी प्रथम एक विट फेकून फिर्यादीच्या मामाला मारल्याचा, त्यानंतर दुसरी विट यशोदा राठोड यांच्या डोक्यावर जीवे मारण्याच्या उद्देशाने फेकल्याचा आरोप आहे. विट डोक्यात लागल्याने त्या जागीच कोसळल्या. त्यानंतर भांडण सोडविण्यास आलेल्या रोहन माणिक आडे यांनाही काठीने मारहाण करण्यात आल्याचा तसेच फिर्यादी राणी राठोड यांनाही मारहाण करून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जखमी यशोदा राठोड यांना तातडीने शासकीय रुग्णालय, अंबाजोगाई येथे दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान आज (15 जुलै) सकाळी सुमारे 6.30 वाजता त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयातून प्राप्त झालेल्या वैद्यकीय अहवालानुसार डोक्यावर बोथट वस्तूचा मार लागल्यामुळे मृत्यू झाल्याचे प्राथमिक अभिप्रायात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात यापूर्वी दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक 292/2026 मध्ये भारतीय न्याय संहिता कलम 103(1) (खून) ची वाढ करण्यात आली असून, न्यायालयात अहवाल सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकरणात सुभाष लष्करे, मंदाकिनी सुभाष लष्करे, विश्व सुभाष लष्करे आणि ईंद्र सुभाष लष्करे (सर्व रा. वडारवस्ती, चनई, ता. अंबाजोगाई, जि. बीड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.